# जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालय

पतंगा मैदान, आमगांव रोड, ता. व जि.गोंदिया
दूरध्वनी क्रमांक ०७१८२-२३६१४७
इमेल आयडी: rdcgon@gmail.com

क्र.कार्या-२/ ५६ /सीआर-२०२० कावि/ दि. ०९/०३/२०२०

वाचा :- १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्रं.४४, दि.४ एप्रिल, २०१९
२. प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ यांचे पत्र क्र. मप्रनि/प्राकाना/११४३/२०१९ दि. २०/०६/२०१९

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त संदर्भिय क्र. १ चे आदेशान्वये गोंदिया जिल्ह्याकरीता जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ च्या अंतर्गत नियमांची अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हास्तरीय जिल्हा सल्लागार समिती स्थापन करावयाची आहे. सदर समितीवर मा.जिल्हाधिकारी अध्यक्ष असून या समितीवर जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, उपायुक्त महानगरपालिका, मुख्य आरोग्य अधिकारी यांना सदस्य म्हणुन नेमलेले आहे. प्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना सदस्य सचिव म्हणुन नेमलेले आहे. तसेच इंडियन मेडीकल असोशिएशनचे एक प्रतिनिधी असणे आवश्यक आहे.

त्याअर्थी गोंदिया जिल्ह्याकरीता जिल्हास्तरीय सल्लागार समितीचे अध्यक्ष/सदस्य खालीलप्रमाणे पदनिहाय असेल.

समिती वरील सदस्यांचे पद:-

| अ.क्र. | समितीवरील अध्यक्ष/ सदस्यांचे पदनाम | समितीवरील पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा शल्यचिकित्सक | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ४ | उप-आयुक्त, महानगरपालिका/मुख्याधिकारी, नप, गोंदिया | सदस्य |
| ५ | आरोग्य अधिकारी, नगरपरिषद, गोंदिया | सदस्य |
| ६ | प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदुषण नियंत्रण मंडळ | सदस्य सचिव |
| ७ | इंडीयन मेडीकल असोशिएशन | प्रतिनिधी |

Scanned by TapScanner

उपरोक्त समिती सदस्यंची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे.

१. जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची जिल्हास्तरावर योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे.
२. समितीची त्रैमासिक बैठक घेणे.
३. मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अॅक्ट- १९४९ च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.
४. खाजगी व शासकीय रुग्णालयाचा जैविक कचरा नोंदणीबाबत आढावा घेणे.
५. रुग्णालयांत किती जैविक वैद्यक कचरा निर्माण होतो व त्याची विल्हेवाट कशी लावली जाते याबाबत आढावा घेणे.
६. जैविक वैद्यक कचरा विल्हेवाट लावण्यासाठी Common Treatment & Disposal Facility याचा आढावा घेणे.
७. जैविक वैद्यक कचरा बाबत शासकीय व खाजगी रुग्णालयांच्या अडीअडचणी जाणून घेणे.
८. जैविक वैद्यक कचऱ्याच्या साठवणूक व विल्हेवाट यासाठी परिणामकारक उपाययोजनांबाबत उपाय सुचविणे व अंमलबजावणी करणे.
९. क्षेत्रिय भेटी देऊन पाहणी करणे.
१०. जैविक वैद्यक कचरा बाबत इतर अनुषंगिक बाबींवर चर्चा व निर्णय घेणे.

जिल्हाधिकारी गोंदिया

प्रतीलिपी:-

१. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, जी.टी.रूग्णालय आवार मुंबई यांना माहितीकरीता.
२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर तथा सदस्य सचिव, जैव वैद्यकीय जिल्हा सल्लागार समिती, गोंदिया यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
३. जिल्हा शल्य चिकित्सक, गोंदिया यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.गोंदिया, यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. आरोग्य अधिकारी, नगर परिषद, गोंदिया यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. अध्यक्ष,इंडियन मेडीकल असोशिएशन, गोंदिया यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

जिल्हाधिकारी गोंदिया

Scanned by TapScanner